**नि.फौ.ख.क्र.१९/२०१८**
**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
**निशाणी क्र.१७**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – श्री. महादेव चंद्रकांत रासकर

**वय** – ३४ वर्षे **धंदा** – व्यवसाय

**राहणार** – कुडाळ, ता.जावली, जि.सातारा

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे**

१. मी कुडाळ येथे आईसोबत राहण्यास आहे. दि.०४.०४.२०१७ रोजी मी व मंगेश कचरे असे कुडाळमध्ये गावात असताना तिथं राहुल ननावरे आले व म्हणाले की, वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांचे नातेवाईक आयडीबीवाय बॅंकेमध्ये डीओ या पदावर कामाला आहेत. ते म्हणाले त्यांची गाठभेट नोकरीसंदर्भात घ्या. दि.०५.०४.२०१७ रोजी मी व मंगेश कचरे हे वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याकडे सांजवात संस्थेची मतिमंद शाळा, कुडाळ येथे गेलो. वर्षा कांबळे व मंगल कांबळे या तिथं मुलांना शिकवण्यास होत्या. त्यावेळी वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी आम्हाला आयडीबीआय बॅंकेत शिपाई पदासाठी साठ हजार रुपये, क्लार्क या पदासाठी साठ हजार रुपये व मॅनेजर पदासाठी एक लाख वीस हजार रुपये भरावे लागतील असे सांगितले. त्यावेळी आमच्याकडे पैसे नसल्यामुळे आम्ही दुसऱ्या दिवशी येतो असे सांगितले. त्याप्रमाणे मी, मंगेश कचरे व नितीन ननावरे ०६.०५.२०१७ रोजी सांजवात संस्थेची मतिमंद शाळा, कुडाळ येथे वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याकडे गेलो. जाताना आम्ही शैक्षणिक कागदपत्रे शाळा सोडल्याचा दाखला, १०वीचे मार्कलिस्ट व पैसे घेवून गेलो होतो. तसेच माझ्याकडे साठ हजार नसल्यामुळे मी गावातील तानाजी वारागडे यांच्याकडून पैसे घेतले व मंगल कांबळे व वर्षा कांबळे तसेच दुसरा व्यक्ती विजय

अर्जून नलावडे, रा. आळजापूर, फलटण हे तिथं उपस्थित होते. मी वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याकडे चाळीस हजार रुपये दिले, मंगेश सुर्यकांत कचरे यांनी त्यांच्या पत्नीचे साठ हजार व मयुर कचरेचे साठ हजार असे एक लाख वीस हजार रुपये दिले. वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी विजय अर्जून नलावडे यांची ते आयडीबीआय बँकेत डीओ या पदावर काम करत असल्याची ओळख करुन दिली. तसेच, मंगल कांबळे यांनी सांगितले की, ते आमचे नातेवाईक आहेत व तेच तुम्हाला कामाला लावणार आहेत. वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी आम्हाला सांगितले की, २०.०५.२०१७ रोजी बी.के.सी.सेंटर, बांद्रा, मुंबई येथे परीक्षा आहे. त्यादिवशी पैसे घेतले म्हणजेच ०६.०५.२०१७ रोजीच आम्हाला २०.०५.२०१७ रोजी परीक्षा असल्याचे त्या दोघींनी आम्हाला सांगितले होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, १७.०५.२०१७ रोजी तुमच्या मोबाईलवर मेसेज येईल व दि.१८.०५.२०१७ रोजी हॉलतिकीट पोस्टाने येईल असे सांगितले. १९.०५.२०१७ रोजी आम्ही पोस्टामध्ये गेलो व हॉलतिकीटची विचारणा केली परंतू हॉलतिकीट आले नव्हते. हॉलतिकीट न आल्यामुळे आम्ही वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आपल्याला मुंबईलाच परीक्षेला जावे लागेल, तिथंच हॉलतिकीट भेटेल. २०.०५.२०१७ रोजी मी, मंगेश कचरे, राहुल ननावरे असे एकुण २० जण मुंबईला बी.के.सी. सेंटर, ब्रांदा येथील आयडीबीआय बँकेत गेलो. आम्हाला गेटवरच अडवण्यात आले. गेटवर चौकशी केल्यानंतर तेथील सिक्युरीटीने वरिष्ठ अधिकारी यांना फोन केला. त्यावेळी आमच्यासोबत वर्षा कांबळे व मंगल कांबळे यादेखील आमच्यासोबत होता. त्या गेटवर बँकेचे वरिष्ठ अधिकारी आले, त्यांचे नांव आता मला सांगता येणार नाही. त्यांनी आम्हाला सांगितले की, विजय अर्जून नलावडे नावाचा व्यक्ती या बँकेत अथवा कोणत्याही शाखेत कामाला नाही. त्यावेळी आमच्या लक्षात आले की, आपली फसवणुक झाली आहे. त्यानंतर आम्ही वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, दिल्ली कोर्टात आमचे नातेवाईक आहेत, त्यांचा विचारणा करुन सांगतो. त्यानंतर आम्ही कुडाळ पोलीस चौकीला गेलो. त्याठिकाणी जबाब घेण्यात आमचे बरेच दिवस गेले. वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी आम्हाला कोरा स्टॅम्प दिला होता. सदरचा स्टॅम्प हा आम्हाला ०६.०५.२०१७ रोजीच मंगल कांबळे यांनी

दिलेला आहे. सदरचा स्टॅम्प हा आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवावा म्हणून दिलेला आहे. कुडाळ पोलीस चौकीवाल्यांनी आम्हाला मेढा पोलीस स्टेशनला जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही दि.२०.०५.२०१७ रोजी मेढा पोलीस स्टेशनला गेलो. आम्ही मुंबईहून २० तारखेलाच परत आलो होतो. मेढा पोलीस स्टेशनवाल्यांनी आम्हाला सांगितले की, घटना कुडाळ पोलीस चौकीच्या हद्दीमध्ये घडली आहे, तुम्ही तिकडे जावा. कुडाळ पोलीस चौकीला आमचे जबाब घेण्यास १५ दिवस गेले. त्यानंतर आशा लिंबराज कराडकर यांनी तक्रार दिली. पोलीस आम्हाला चौकशी करतो म्हणून थांबवत होते. मी तीनही आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी आरोपी मंगल कांबळे व वर्षा कांबळे या हजर आहेत. आरोपी मंगल कांबळे व वर्षा कांबळे ज्या संस्थेत काम करत होत्या ती संस्था संजय सुभेदार शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, कुडाळ यांची होती. त्यानंतर मंगल कांबळे, वर्षा कांबळे यांचा आमच्याशी कॉन्टॅक्ट झाला नाही.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.जी.गोरे यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

२. मी कायमस्वरुपी कुडाळ येथे राहण्यास आहे. कुडाळमध्ये घर व शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, सांजवात संस्था ही माझ्या चांगल्या माहितीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी येता जाता सदर संस्था पहात होतो. माझे शिक्षण १०वी झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मला इंग्रजीचे थोडेफार ज्ञान आहे. मी १०वी नापास आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी भरतीसाठी जाहिराती बघतो. हे म्हणणे खरे आहे की, जाहीरातींमध्ये पगार किती, शिक्षण किती या अटी शर्ती लिहिलेल्या असतात. मला आयडीबीआय बँक काय आहे ते सांगता येणार नाही. फक्त ती बँक आहे हे मला माहिती आहे. बँकेच्या कार्यक्षेत्राबाबत मला माहिती नाही. बी.के.सी. बांद्रा येथील पोलीस स्टेशनला आम्ही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दुसऱ्यादिवशी कुडाळ पोलीस स्टेशनला आलो. हे म्हणणे खरे नाही की, कुडाळला आमच्यापैकी कोणीही तक्रार केली नाही.

प्रश्न – तुमची तक्रार का घेतली नाही ते कारण सांगू शकता का ?

उत्तर – त्यांनी आम्हाला मेढयाला पाठवले.

कुडाळ पोलीस चौकीने आमची तक्रार लिहून घेतली नाही म्हणून आम्ही त्यांच्या वरिष्ठांकडे तक्रार केली नव्हती. तसेच, आम्ही मेढयाला आल्यानंतर आमची मेढयाला तक्रार न घेता त्यांनी आम्हाला कुडाळला जाण्यास सांगितले. मेढयाला तक्रार घेतली नाही म्हणून आम्ही सातारा एस.पी. यांना कळविले नव्हते. तसेच, कोल्हापुरच्या डी.आय.जी. यांना कळविले नाही.

प्रश्न – तुम्ही कोठेच तक्रार केली नाही ?

उत्तर – आमची तक्रार न घेतल्यामुळे केली नाही.

आमची तक्रार घेतली नाही म्हणून आम्ही कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वर्षा व मंगल हे राहणार खडकी, ता.वाई, जि.सातारा येथील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वर्षा व मंगल यांचे संपूर्ण नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर संस्था ही कायम विनाअनुदानित संस्था आहे. संजय सुभेदार शिंदे यांच्याकडे आम्ही वर्षा व मंगल कांबळे यांच्याविरुध्द लेखी तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, ९वी पास शैक्षिणक अर्हतेसाठी त्यावेळी कोणतीही नोकरी नव्हती. साक्षीदार सांगतो की, शिपाई या पदासाठी मी पैसे भरले होते. त्यांनी मला शिपायाच्या पदासाठी शैक्षणिक अटीबाबत काही सांगितले नव्हते.

प्रश्न – विजय अर्जून नलावडे यांनी तुम्हाला ९वी पास कोणते पद आहे याबाबात काही सांगितले होते का ?

उत्तर – विजय नलावडे, वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांनी १०वी नापास साठी शिपाई हे पद असल्याचे सांगितले होते.

हे म्हणणे खरे नाही की, ९वी पास वाल्यांना त्यावेळी कोणत्याही नोकऱ्या नव्हत्या.

प्रश्न – तुम्ही व्यक्तिशः कोणत्याही पोलीस स्टेशनला तक्रार केली नाही ?

उत्तर – व्यक्तिशः नाही केली.

मेढा पोलीस स्टेशन वाल्यांनी कुडाळ पोलीस चौकीला कधी पाठवले हे मला सांगता येणार नाही. कुडाळ पोलीस चौकीला कधी गेलो ते मला सांगता येणार नाही. कुडाळ पोलीस चौकीला आमच्याबरोबर २०–२५ जण होते. पोलीस स्टेशनला आम्ही परत गेल्यावर एकत्र आलेलो नाही. माझा जबाब कोणी घेतला ते मला आता सांगता येणार नाही. माझ्याबरोबर असणाऱ्या लोकांचा जबाब वेगवेगळया दिवशी घेतला गेला. वर्षा

कांबळे व मंगल कांबळे यांचे नातेवाईक आयडीबीआय बँकेत कामाला आहेत व ते आम्हाला नोकरीला लावणार आहेत याबाबत व्यक्तिशः चौकशी केलेली नाही. विजय अर्जून नलावडे यांचे आधार कार्डची झेरॉक्स दिलेली आहे. सदर झेरॉक्सचे सत्यतेबद्दल आम्हाला माहिती नाही. आम्ही आरोपीला पैसे दिल्याची त्यांच्याकडून पोहोच घेतली नाही. तसेच, कागदपत्रं दिल्याची पोहोच घेतली नाही. आम्ही पैसे दिल्याबाबत आरोपींनी आम्हाला लेखी काहीही दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना पैसे न दिल्यामुळे आम्ही त्यांच्याकडून लेखी काहीही घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोकर भरती करायची झाल्यास जाहीरात येते. हे म्हणणे खरे आहे की, त्या जाहीरातींमध्ये कोणती कोणती पदे रिक्त आहेत त्याचा उल्लेख असतो व त्याप्रमाणे पगार किती हेदेखील दिले जाते. या घटनेबद्दल आम्ही जाहीरात वाचली नव्हती. मी या नोकरी लावण्याच्याबाबत सत्यता पडताळली नाही. हे म्हणणे खरे नाही की, नलावडे यांनी आम्हाला परीक्षेबाबत तयारी करुन घेतो, पूर्तता करुन घेतो असे सांगितले होते. आम्हाला हॉलतिकीट आले नाही म्हणून आम्ही मंगल कांबळे व वर्षा कांबळे यांच्याकडे तक्रार केली होती. वर्षा कांबळे व मंगल कांबळे यांच्याव्यतिरिक्त हॉलतिकीट न आल्याबाबतची तक्रार इतर कोणाकडे केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मंगल कांबळे व वर्षा कांबले यांचे नातेवाईक हेदेखील नोकरीसाठी बी.के.सी.सेंटर मुंबई येथे आमच्याबरोबर आले होते. हॉलतिकीट न आल्याबाबत आम्ही पोस्टात तक्रार न करता चौकशी केली. हे म्हणणे खरे आहे की, बी.के.सी.सेंटर, मुंबई येथे आयडीबीआय चे सेंटर आहे. बी.के.सी. सेंटर येथे आम्ही सर्वांनी एकत्र अर्ज करुन लेखी तक्रार नोंदवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या तिघांचा जबाब एकत्रच घेतला. आरोपीने मला निशाणी क्र.१९ सोबतचा स्टॅम्प हा ०६.०५.२०१७ रोजी दिलेला आहे. पोलीसांनी आम्हाला कोणतीही कागदपत्रे मागितली नव्हती, त्यामुळे आम्ही दिली नव्हती.

प्रश्न – निशाणी क्र.१९ सोबतचा स्टॅम्पेपर तुम्हाला पोलीसांना देण्यास काही अडचण नव्हती ?

उत्तर – पोलीसांनी आम्हाला सहकार्य केले नाही, आमच्याकडे पेपर मागितले नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की, स्टॅम्पबद्दल फक्त मला व्यक्तिशः माहिती होती. हे म्हणणे खरे नाही की, मंगल कांबळे यांच्या पिशवी व त्यातील आधार कार्ड, पॅनकार्ड व निशाणी

क्र.१९ सोबतचा स्टॅम्प मी चोरुन नेले. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही मुंबईहून २० तारखेलाच परत आलो होतो, मेढा पोलीस स्टेशनवाल्यांनी आम्हाला सांगितले की, घटना कुडाळ पोलीस चौकीच्या हद्दीमध्ये घडली आहे, तुम्ही तिकडे जावा, कुडाळ पोलीस चौकीला आमचे जबाब घेण्यास १५ दिवस गेले, त्यानंतर आशा लिंबराज कराडकर यांनी तक्रार दिली, पोलीस आम्हाला चौकशी करतो म्हणून थांबवत होते हा मजकूर माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. तो माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मंगल कांबळे व वर्षा कांबळे ज्या संस्थेत काम करत होत्या ती संस्था संजय सुभेदार शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, कुडाळ यांची होती, त्यानंतर मंगल कांबळे, वर्षा कांबळे यांचा आमच्याशी कॉन्टॅक्ट झाला नाही हा मजकूर माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. तो माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर हा खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विजय अर्जून नलावडे हा पोलीसांना मिळत नसल्यामुळे या दोन महिला आरोपींच्या विरोधात खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी वर्षा व मंगल कांबळे यांचा पैशाच्या व्यवहाराशी काही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आमचे पैशाचे व्यवहार हे आरोपी नलवडे याच्यासोबत झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नोकरीची डीलदेखील आरोपी क्र.१ सोबत झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांचा या केसशी काहीही संबंध नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा — रविंद्र भ. खवले,

**दिनांक** : १०.०५.२०२३ — **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**